रे.के.नं. १०९/१९

नि.क्र. ५६/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | महेश हिराजी पाटील |
| वय | - | ४८ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी |
| राहणार | - | मोठी जुई, ता.उरण जि. रायगड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...**

१. मी न्यायालयात बसलेल्या सर्व आरोपींना ओळखतो कारण ते माझ्या गावातले राहणारे आहेत. मला घटनेबद्दल काही आठवत नाही. मला घटनेबद्दल काही सांगता येत नाही. पोलिसांनी वाद झाला म्हणून मला पोलिस ठाण्यात बोलवले होते. माझे गाव मोठी जुई आहे. असे काही घडले नव्हते की दिनांक १४.०३.२०१९ रोजी संध्याकाळी ५ वाजण्याच्या सुमारास आरोपीने फिर्यादीच्या जागेत अनधिकृतरित्या प्रवेश केला व फिर्यादीला मारहाण करून शिवीगाळ करून धमकी दिली.

**(सहा. सरकारी वकीलांनी साक्षीदार सरकारीपक्षाला सहकार्य करत नसल्याचे सांगून उलटतपासात विचारता येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली.**

**परवानगी दिली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, १४.०३.२०१९ रोजी मी पनवेल येथे कामानिमित्त गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, सायंकाळी साडेपाच वाजता परत

माझ्या घरी आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आता मला वाचून दाखवण्यात आलेल्या अधोरेखांकित भाग 'अ' मी पोलिसांना सांगितला होता. पोलिसांनी तो मजकूर का लिहिला हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्याने त्यांना शिक्षा होऊ नये म्हणून मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी.डी. म्हात्रे यांच्यामार्फत...**

उलटतपास नाकारण्यात आला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (ल.मु.सय्यद)

दिनांक – ०९.१२.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण